कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ता.जि.लातूर

इतिहास विभाग

शैक्षणिक वर्ष 2026-27



इतिहास अभ्यास मंडळाची स्थापना दिनांक 13.08.2026 रोजी करण्यात आली. त्यावेळी प्रा.डॉ.नरेंद्र देशमुख, प्रा.डॉ.इंद्रजीत शिंदे व विद्यार्थी दिसत आहेत.



इतिहास अभ्यास मंडळाची स्थापना दिनांक 13.08.2026 रोजी करण्यात आली. त्यावेळी प्रा.डॉ.नरेंद्र देशमुख, प्रा.डॉ.इंद्रजीत शिंदे व विद्यार्थी दिसत आहेत.

कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ता.जि.लातूर

इतिहास विभाग

शैक्षणिक वर्ष 2026-27



दिनांक 22.08.2026 रोजी इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन वसंतराव काळे महाविद्यालय ढोकी ता.जि.धाराशिव येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ.नानासाहेब मनाळे उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करताना



दिनांक 22.08.2026 रोजी इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन वसंतराव काळे महाविद्यालय ढोकी ता.जि.धाराशिव येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ.नानासाहेब मनाळे उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करताना. सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे, प्रा.डॉ.नरेंद्र देशमुख, प्रा.महारुद्र बिडवे व अभ्यास मंडळाची अध्यक्षा विद्यार्थीनी कु.मेघा कांबळे व प्रा.इंद्रजीत शिंदे

अभ्यास मंडळ उद्घाटन बातमी

समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची प्रेरणा इतिहासातून मिळते : डॉ. नानासाहेब मनाळे



लातूर (महेश गाडेकर) :– इतिहास म्हणजे केवळ राजा–राण्यांच्या गोष्टी किंवा युद्धांच्या तारखा नव्हेत. ज्याला भूतकाळ माहीत नाही, तो भविष्यकाळ घडवू शकत नाही. इतिहास आपल्याला जगण्याची दिशा देतो. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले यांसारख्या महापुरुषांचे विचार, कार्य आणि सामाजिक योगदान समजून घेण्यासाठी इतिहासाचा सखोल अभ्यास आवश्यक आहे. इतिहासाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची प्रेरणा मिळते.असे प्रतिपादन वसंतराव काळे महाविद्यालय ढोकी येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. नानासाहेब मनाळे यांनी केले

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. अध्यक्षीय समारोप करताना इतिहास अभ्यास मंडळाच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. यामध्ये ऐतिहासिक किल्ले व संग्रहालयांना भेटी, तज्ज्ञ इतिहासकारांची व्याख्याने, वक्तृत्व व निबंध स्पर्धा, किल्ले बनविण्याच्या स्पर्धा तसेच जुनी नाणी, ऐतिहासिक दस्तऐवज, शस्त्रे आणि पुस्तकांचे प्रदर्शन यांचा समावेश असेल. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी जिज्ञासा निर्माण होऊन संशोधनवृत्ती विकसित होण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविकात प्रा. डॉ. नरेंद्र देशमुख यांनी इतिहास अभ्यास मंडळाची भूमिका स्पष्ट केली. हे मंडळ केवळ काही विद्यार्थ्यांपुरते मर्यादित न राहता सर्व विद्यार्थ्यांसाठी विचारमंथनाचे आणि ज्ञानवृद्धीचे व्यासपीठ असेल. विद्यार्थ्यांनी मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. इंद्रजीत शिंदे यांनी केले, तर कुमारी मेघा कांबळे इतिहास मंडळाध्यक्ष यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, अभ्यास मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. इतिहासाच्या अभ्यासातून वर्तमान समजून घेत भविष्य घडविण्याचा संदेश देत कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

देशोन्नती

सकारात्मक परिवर्तनाची प्रेरणा इतिहासातून मिळते - डॉ. मनाळे



Latur Edition
Aug 24, 2026 Page No. 2
Powered by: erelego.com

समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची प्रेरणा इतिहासातून मिळते : डॉ. नानासाहेब मनाळे

बाभळगाव : इतिहास म्हणजे केवळ राजा-राण्यांच्या गोष्टी किंवा युद्धांच्या तारखा नव्हेत. ज्याला भूतकाळ माहीत नाही, तो भविष्यकाळ घडवू शकत नाही. इतिहास आपल्याला जगण्याची दिशा देतो. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले यांसारख्या महापुरुषांचे विचार, कार्य आणि सामाजिक योगदान समजून घेण्यासाठी इतिहासाचा सखोल अभ्यास आवश्यक आहे. इतिहासाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची प्रेरणा मिळते.असे प्रतिपादन डॉ. नानासाहेब मनाळे इतिहास विभाग प्रमुख वसंतराव काळे महाविद्यालय ढोकी जि. धाराशिव यांनी केले

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. अध्यक्षीय समारोप करताना इतिहास अभ्यास मंडळाच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. यामध्ये ऐतिहासिक किल्ले व संग्रहालयांना भेटी, तज्ज्ञ इतिहासकारांची व्याख्याने, वक्तृत्व व निबंध स्पर्धा, किल्ले बनविण्याच्या स्पर्धा तसेच जुनी नाणी, ऐतिहासिक दस्तऐवज, शस्त्रे आणि पुस्तकांचे प्रदर्शन यांचा समावेश असेल. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी जिज्ञासा निर्माण होऊन संशोधनवृत्ती विकसित होण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविकात प्रा. डॉ. नरेंद्र देशमुख यांनी इतिहास अभ्यास मंडळाची भूमिका स्पष्ट केली. हे मंडळ केवळ काही विद्यार्थ्यांपुरते मर्यादित न राहता सर्व विद्यार्थ्यांसाठी विचारमंथनाचे आणि ज्ञानवृद्धीचे व्यासपीठ असेल. विद्यार्थ्यांनी मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. इंद्रजीत शिंदे यांनी केले, तर कुमारी मेघा कांबळे इतिहास मंडळाध्यक्ष यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, अभ्यास मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. इतिहासाच्या अभ्यासातून वर्तमान समजून घेत भविष्य घडविण्याचा संदेश देत कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.